☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट / 320 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 19 / 08 / 2025

# प्रेसनोट

## ''नांदेड पोलीसांचे प्रयत्नाने कंबोडीयात अडकलेला मुलगा मायदेशी परत''

दिनांक 15.02.2025 रोजी शेख समीर शेख महेबुब, वय 25 वर्षे, रा.रहीमपुर वसरणी, नांदेड हे एजंट मार्फत जॉबसाठी मुंबई येथुन कंबोडीया या देशात गेले असता तिथे गेल्यावर शेख समीर यांना बेकायदेशीर क्रिप्टो करन्सी स्कॅम चे काम करण्यास सांगण्यात आले. सदर काम करण्यास त्यांनी नकार दिला असता त्यांना तेथे सदर काम करणे बाबत त्यांचेवर जबरदस्ती करत त्यांना शिवीगाळ व मारहाण करण्यात येवू लागली व सदर मारहाण करतांनाचे व्हिडीओ शेख समीर यांचे घरी पाठवून पैशांची मागणी करण्यात येवू लागली.

त्यामूळे शेख समीर यांचे नातेवाईक हे **मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांना भेटले व त्यांना वरील सर्व हकीकत सांगीतली असता त्यांनी सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही सुरू करून लागलीच कंबोडीया देशातील भारतीय दूतावास कार्यालयाशी संपर्क साधला व त्यांचे संपर्कात राहूण पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथील एक पत्र शेख समीर यांचे नातेवाईकांना देवून त्यांना मिनीस्ट्री ऑफ एक्सटर्नल अफेअर्स कार्यालय, दिल्ली येथे तक्रार देणे कामी पाठविले तेथे जावून नातेवाईकांनी तक्रार दिली. त्यानंतर सुध्दा मा.श्री अबिनाश कुमार,पोलीस अधीक्षक, नांदेड हे सदर बाबत भारतीय दुतावास कार्यालयाकडून वेळोवेळी पाठपूरावा घेवू लागले दरम्याण मा. पोलीस अधीक्षक साहेब यांचे प्रयत्नांना यश आले व दि.14 / 08 / 2025 रोजी शेख समीर शेख महेबुब हे सुरक्षितरित्या भारतात परत आले आहेत.

आपले मुलास सुखरूपरित्या घरी परत आलेले पाहुण नातेवाईकांच्या डोळयात आनंद अश्रू आले त्यांनी पोलीस प्रशासनाचे व विशेषता मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांचे आभार मानले.

**मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड**, यांनी शेख समीर शेख महेबुब, वय 25 वर्षे, रा. रहीमपुर वसरणी, नांदेड यांचे पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड येथे पुष्पगूच्छ देवून स्वागत केले.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड